# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

**( महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक स्वायत्त संस्था )**

शातंको/शै स क /सम सत्र/२०२१-२२/ 678 दि.:- १५/०२/२०२२

## विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी ऑफलाईन वर्गाकरिता उपस्थित रहाणेकरिता आवश्यक सुचना

संदर्भ: १) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण /२०२१/प्र. क्र. ६/वि शि -३ दि. २५. ०१. २०२२

संस्थेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनीना सूचित करण्यात येते कि आपले शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील **सम सत्र (EVEN 2021-22)** हे दिनांक **२१ फेब्रुवारी २०२२** पासून ऑफलाईन द्वारे (नियमित वर्ग) सुरु होत आहे. नियमित वर्गास उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनी नी खालील नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे:-

१) उपस्थित राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनींचे कोविड १९ लसीचे दोन्ही डोसेस पूर्ण असणे आवश्यक.

२) नियमित वर्गामध्ये विद्यार्थी / विद्यार्थिनीनी केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी कोविड १९ बाबत प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचना चे पालन करणे आवश्यक आहे उदा. मास्कचा वापर करणे, Social Distancing पाळणे, Sanitizer चा वापर इत्यादी.

३) दिनांक २१ फेब्रुवारी २०२२ रोजी सर्व विद्यार्थी / विद्यार्थिनीनी कोविड १९ लसीचे दोन्ही डोसेस पूर्ण असलेबाबतचे प्रमाणपत्र व विहित नमुन्यामध्ये पालकांचे समंतीपत्र (संमतीपत्राचा नमुना या सूचनेसोबत दिलेला आहे) आपल्या वर्ग शिक्षकांकडे जमा करणे आवश्यक राहील.

४) ज्या विद्यार्थी / विद्यार्थिनीचे कोविड १९ लसीचे डोसेस अपूर्ण असतील त्यांनी तात्काळ लसीकरण करून घेणे आवश्यक आहे. लसीकरण करून घेणेची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी / विद्यार्थिनी व त्यांचे पालक यांची असेल.

५) सध्या ज्या विद्यार्थी / विद्यार्थिनी चे कोविड १९ लसीचे डोसेस अपूर्ण आहेत अश्या विद्यार्थ्यांकरिता पहिले २ आठवडे Online teaching Learning mode ची सोय यापूर्वी प्रमाणे उपलब्ध राहील. त्यानंतर नियमित वर्गाद्वारेच शिक्षणाची पद्धत अवलंबिण्यात येईल.

६) या सत्रामध्ये नियमाप्रमाणे ७५ % उपस्थिती असणे बंधनकारक राहील. सत्रामध्ये ज्या विद्यार्थी / विद्यार्थिनी ची उपस्थिती ७५ % पेक्षा कमी असेल त्यांना नियमांप्रमाणे detain (DT) करण्यात येईल.

याबाबत विद्यार्थी / विद्यार्थिनी / पालक यांना शंका असल्यास त्यांनी आपल्या वर्ग शिक्षकांशी संपर्क साधावा.

**डॉ. डी. एम. गर्गे**

प्र. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

**प्रत:**

१) सर्व विभाग प्रमुख यांना विभागातील सर्व विद्यार्थी/विद्यार्थिनींना व्हाट्सअँप / मेल द्वारे पाठवण्याकरिता

२) ऑफिस / स्टुडंट्स सेकशन यांना माहितीकरिता

३) विभाग प्रमुख माहिती तंत्रज्ञान यांना - संस्थेच्या website वर अपलोड करणेकरीता

# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

**( महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक स्वायत्त संस्था )**

---

प्रति,
सर्व पालक,

संदर्भ: १) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण /२०२१/प्र. क्र. ६/वि शि -३ दि. २५. ०१. २०२२

उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकान्वये, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील सम सत्र (EVEN 2021-22) हे दिनांक २१ फेब्रुवारी २०२२ पासून ऑफलाईन (नियमित वर्ग) पद्धतीने सुरु होत आहे. नियमित वर्गास उपस्थित राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थी/ विद्यार्थिनी चे कोविड १९ लसीचे दोन्ही डोसेस पूर्ण असणे बंधनकारक आहे. नियमित वर्गामध्ये विद्यार्थी/विद्यार्थिनीनी केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी कोविड १९ बाबत प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचना पाळणे बंधनकारक राहील उदा. मास्कचा वापर करणे, Social Distancing पाळणे, Sanitizer चा वापर इ. आपण सुद्धा आपल्या पाल्याला सूचना दयाव्यात व आरोग्य विषयक काळजी घेण्यासाठी अवगत करावे. तसेच खालील संमतीपत्र पालकांनी दोन प्रतीत स्वाक्षरी करून पाल्याकडे द्यावे.

प्राचार्य, शा. तं. कोल्हापूर

# संमतीपत्र

मी माझ्या पाल्याला प्रत्यक्ष ऑफलाईन (नियमित वर्ग) पद्धतीने संस्थेमध्ये उपस्थित राहण्याची परवानगी देत आहे. या काळात कोणतीही आरोग्यविषयक व इतर अडचण निर्माण झाल्यास मी संस्थेला जबाबदार धरणार नाही. मी माझ्या पाल्याला सर्व सूचना दिलेल्या आहेत व आरोग्यविषयक काळजी घेण्यासंबंधी अवगत केलेले आहे.

दिनांक: ________________________________

पालकांची सही : __________________________

पालकांचे पूर्ण नाव: ____________________________________________________

पूर्ण पत्ता: __________________________________________________________

__________________________________________________________________

पालकांचा मोबईल क्रमांक: _____________________________________________

विद्यार्थी विद्यार्थिनी चे नाव: __________________________________________________

विद्यार्थी/विद्यार्थिनी चा वर्ग व शाखा: ____________________________________________

विद्यार्थी/विद्यार्थिनी चा Roll नंबर: ____________________________

विद्यार्थी/विद्यार्थिनी ची सही: ______________________________

विद्यार्थी/विद्यार्थिनीचा मोबईल क्रमांक: _______________________________________

Photograph of Student

प्रति,
मा. प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर